वसई विरारच्या साईनगरमध्ये आढळला कोरोनाचा रुग्ण; कॉरोनाग्रस्तांची संख्या ८

वार्ताहर

एव्हरशाइन सिटी (वसई -पूर्व), गोकुळ टाऊनशिप (विरार), निळेमोरे (नालासोपारा), साईनगर (वसई-प.) सील !

वसई, दि. १ - वसई विरार महापालिका क्षेत्रांत गेले चार दिवस दररोज कोरोनाग्रस्तांच्या संख्येत भर पडत असून, आज ही संख्या सात वरून आठवर पोहचली आहे. वसई रोड (प)येथील साईनगर येथे अमेरिकेहून प्रवास करून आलेल्या ३० वर्षीय हवाई सुंदरीस कोरोनाची लागण झाल्याचे आज स्पष्ट झाले असून तिला उपचारासाठी मुंबईच्या कस्तुरबा हॉस्पिटमध्ये दाखल करण्यात आले आहे. या रुग्णासोबत राहणाऱ्या त्यांच्या माता-पित्यास अन्यत्र आयसोलेशन सेंटरमध्ये दाखल करून त्यांची तपासणी सुरु आहे.

साईनगर येथील गार्डन व्ह्यु या रुग्ण राहात असलेल्या इमारतीचा सुमारे दीड किलोमीटरचा परिसर माणिकपूर पोलिसांनी सील केला असून त्या परिसरात नऊ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. बाहेरील व्यक्तीस आत किंवा आतील कुणाला बाहेर जाऊ देत नाही आहेत. माणिकपूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी स्वतः या भागात दौरा करून ध्वनीक्षेपकावरून जनतेला जागृतीपर सूचना दिल्या. महापालिकेच्या आरोग्य पथकाने या इमारतीच्या आजूबाजूच्या सुमारे ५० इमारतीच्या परिसरात धूर फवारणीद्वारे निर्जंतुकीकरण केले असून, तेथील रहिवाशांच्या आरोग्याची विचारपूस करण्यात येत असल्याचे नवघर माणिकपूर प्रभाग समितीचे प्रभारी सहाय्यक आयुक्त ग्लिसन घोन्साल्विस यांनी सांगितले.

वसई विरार शहरात गत सप्ताहात एव्हरशाइन सिटी परिसरात आधी दोन आणि नंतर त्यांच्या संसर्गापासून आणखी तीन असे पाच कोरोना रुग्ण एकाच परिसरात आढळून आले होते. हा परिसर, सोमवारी सहावा रुग्ण आढळला तो विरार पश्चिमेचा गोकुळ टाऊनशिप भाग, तसेच मंगळवारी जसलोक इस्पितळात काम करणारा सातवा रुग्ण आढळला तो निळेमोरे परिसरही सील करण्यात येऊन तेथील इमारतींचे निर्जंतुकीकरण करण्याबरोबरच नेमलेल्या साठ आरोग्य पाथकांमार्फत रहिवाश्यांकडे त्यांच्या आरोग्याची विचारपूस आणि गरजेनुसार तपासणी करण्याचे काम सुरु आहे. एव्हरशाइन सिटी (वसई -पूर्व), गोकुळ टाऊनशिप(विरार), निळेमोरे (नालासोपारा), साईनगर (वसई-प.) या रुग्ण आढळलेल्या वस्त्यामधील तपासणी पूर्ण झाल्या नंतर पोलिसांकडून या ठिकाणचे निर्बंध मागे घेण्यात येतील, अशी माहिती देण्यात आली.

सर्वांना विनंती....

मुंबईतील विविध रुग्णालयात काम करणाऱ्या वसई विरार परिसरातील सर्व डॉक्टर्स, तंत्रज्ञ, नर्स, वॉर्ड बॉय, स्वच्छता दूत यांना विनंती आहे की, आपण नोकरी करत असलेल्या रुग्णालयात दाखल करण्यांत आलेल्या कोरोना बाधित रुग्णांवर स्वत:चा जीव धोक्यात घालून उपचार करत आहात व त्यांना वाचविण्याची प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहात. परंतु आपल्या कर्तव्याचे पालन करताना आपणास स्वत:सोबतच आपल्या बरोबर काम करणाऱ्या सहकाऱ्यांची, आपल्या घरातील आप्तजनांची, शेजारीपाजारी, नातेवाईक, मित्रपरिवार यांची देखील काळजी घ्यावी लागणार आहे. आपल्यामुळे कोणालाही संसर्ग होवू नये याची काळजी घेण्याबरोबरच संसर्गाची शक्यता असणाऱ्या सर्व गोष्टींपासून त्यांना दूर रहाण्यास प्रवृत्त करावे लागणार आहे. त्यामुळे आपण कोरोना पासून स्वत:ला दूर ठेवा आणि दुसऱ्यांना पण दूर रहाण्यास भाग पाडावे.

- मुकेश सावे, माजी नगराध्यक्ष, विरार

कल्याण-डोंबिवलीत चार नवे रुग्ण

वृत्तसंस्था

कल्याण, दि. १ - डोंबिवली शहरातील कोरोनाबाधितांची संख्या वाढत असून मंगळवारी कोरोनाचा संसर्ग झालेले आणखी चार रुग्ण आढळले. यामुळे शहरातील एकूण कोरोना रुग्णांची संख्या १४ वर गेली आहे. डोंबिवलीत पार पडलेल्या शाही लग्नसोहळ्याला आणि हळदी समारंभाला उपस्थित राहिलेल्या तरुणाला कोरोनाची लागण झाल्याचे समोर आल्यानंतर त्याच्या संपर्कात आलेल्या आणखी दोघांचा अहवाल मंगळवारी पॉझिटिव्ह आला. त्याचबरोबर कल्याण पश्चिमेकडीतील एका तरुणाला आणि डोंबिवली रिजन्सीमध्ये राहणाऱ्या ५४ वर्षीय महिलेला कोरोनाची लागण झाल्याचे कल्याण-डोंबिवली महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

डोंबिवलीतील आयरे परिसरात १९ मार्च रोजी आयोजित केलेल्या एका लग्नसोहळ्याला उपस्थित असलेल्या तुर्कीवरून आलेल्या तरुणाला कोरोनाची लागण झाली. या तरुणाला घरीच विलग राहण्याचा सल्ला देऊनही तो या लग्नाला उपस्थित होता. यामुळे या परिसरातील रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. २५ मार्च रोजी त्याला लागण झाल्याचे निदान झाल्यानंतर दोन दिवसांपूर्वी त्याच्या संपर्कात आलेल्या एका ६० वर्षीय महिलेला आणि तिच्या मुलालाही या आजाराची लागण झाल्याचे स्पष्ट झाले, तर मंगळवारी या तरुणाच्या परिसरात राहणाऱ्या आणखी दोन समवयस्क तरुणांना कोरोनाचा संसर्ग झाल्याचे निदान झाले. यानंतर डोंबिवली दावडी रिजन्सीमध्ये चार दिवसांपूर्वी पुण्यातून आलेल्या ५४ वर्षीय महिलेला कोरोनाची लागण झाली असून कल्याण पश्चिमेकडील बेतूरकरपाडा येथील एक तरुणदेखील कोरोनाने बाधित झाला आहे. यामुळे शहरातील कोरोना रुग्णांची संख्या १४ वर पोहोचल्याचे पालिका प्रशासनाने जाहीर केले.

रुग्ण सापडलेल्या परिसरात पालिकेच्या आरोग्य विभागाकडून औषध फवारणी केली जात आहे. तसेच परिसर सील करून आजूबाजूच्या जवळपास ३ किलोमीटरच्या परिसरातील नागरिकांची तपासणी केली जात आहे, असे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले. डोंबिवलीतील लग्नसोहळ्यात सहभागी झालेल्या तरुणाच्या संपर्कात आल्याने आतापर्यंत चौघांना करोनाची लागण झाल्याचे कळताच लग्नाला उपस्थित असलेले सर्वच जण धास्तावले असून या लग्नसोहळ्याला उपस्थित असलेल्या सर्वांनीच इतरांच्या संपर्कात येणे टाळावे, असे आवाहन पालिका आयुक्तांनी केले आहे.

पाच तास रुग्णवाहिकेची प्रतीक्षा

रिजन्सीमधील ५४ वर्षीय महिलेला कोरोनाची लागण झाली असून तिला मुंबईतील रुग्णालयात पाठवण्यासाठी पाच तासांपासून स्थानिक आमदार राजू पाटील वारंवार प्रशासनाशी संपर्क साधला. मात्र पालिकेच्या दोन्ही रुग्णवाहिका रुग्ण घेऊन मुंबईला गेल्या असून त्या आल्याखेरीज रुग्णाला पाठवता येणार नसल्याचे उत्तर देण्यात आल्याचे पाटील यांनी सांगितले. एकाच वेळी चार रुग्ण सापडल्यानंतर पालिकेची अवस्था अशी असेल, तर पुढे रुग्णांची संख्या वाढल्यास पालिका प्रशासन कशी सेवा देणार, असा संतप्त प्रश्न पाटील यांनी उपस्थित केला.

नवी मुंबईतही आणखी दोन रुग्ण

नवी मुंबई, दि. १ (वार्ताहर) - नवी मुंबई शहरात मंगळवारी कोरोनाचे आणखी दोन नवीन रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे शहरातील कोरोनाग्रस्त रुग्णांची संख्या आता दहा झाली आहे. दिवसेंदिवस कोरोनाच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

वाशी येथे मंगळवारी कोरोनाचा एक रुग्ण आढळून आला होता. हा रुग्ण वाशीतील मशिदीमध्ये फिलिपिन्स नागरिकाच्या संपर्कात आल्याचे समजले आहे. या नागरिकाच्या संपर्कात आलेल्या ५२ जणांचे सध्या घरी विलगीकरण करण्यात आले आहे. दुसरा रुग्ण नेरूळ येथे आढळून आला असून तो मुंबईमध्ये एका करोनाबाधिताच्या संपर्कात आला होता. या दोघांनाही मुंबई येथील कस्तुरबा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

उल्हासनगरमधील खाजगी रुग्णालये बंद ठेवाल तर परवाने रद्दचा इशारा

वार्ताहर

उल्हासनगर, दि. १ - कोरोनाच्या भीतीपोटी उल्हासनगर शहरात अनेक खाजगी रुग्णालयाच्या डॉक्टरांनी आपले रुग्णालये बंद करून घरी बसण्यास पसंती दिली आहे. यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. यासंदर्भात मनपा आयुक्तांकडे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी खाजगी रुग्णालये सुरू करण्यात यावे अन्यथा संबंधित रुग्णालयाचे परवाने रद्द करण्यात येईल असे आदेश दिले आहेत .

कोरोना संसर्ग टाळण्यासाठी देशभरात लोकडाऊन करण्यात आले असले तरी खाजगी रुग्णालये सुरू राहणार असल्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. मात्र असे असताना देखील उल्हासनगर शहरात अनेक खाजगी रुग्णालये बंद असल्याचे निदर्शनास आले आहे.यामुळे रुग्णांची गैरसोय होत असून आहे. दरम्यान खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांनी रुग्णालय सुरू न केल्यास महापालिका त्याचे परवाने रद्द करणार असल्याची माहिती माहापालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांनी दिली.

शिर्डी येथील पालखी निवारामध्ये बेघरांची सोय

वार्ताहर

शिर्डी, दि. १ - शिर्डी परिसरातील कष्टकरी, कामगार व बेघर व्यक्तींना पालखी निवाराच्या व्यवस्थापनाने आधार दिला असून येथे सुमारे १०० जणांची सोय करण्यात आली आहे. येथील सर्व कामगार व बेघरांची स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पथकाने वैद्यकीय तपासणी केल्यानंतर त्यांना या निवाऱ्यात दाखल करून घेण्यात आले आहे. त्यांना शिर्डी संस्थांतर्फे दोन वेळचे जेवण देण्यात येत आहे. मात्र येथे राहणाऱ्यांना व्यवस्थापनाच्या अनुमतीशिवाय बाहेर जाता येणार नाही.

शिर्डी परिसरात अडकलेले कामगार व बेघर नागरीक यांची सोय कुठे करायची, अशा विवंचनेत स्थानिक प्रशासन सापडले होते. गेले काही दिवस हे कामगार व बेघर हे बस्थानकात राहत होते. मात्र तेथे स्वच्छतागृह, इतर सोयी-सुविधांचा अभाव व परिसरात आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेऊन प्रांताधिकारी गोविंद शिंदे यांनी सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली. सदर बैठकीस संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण डोंगरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र ठाकरे, पोलीस उपअधीक्षक सोमनाथ वाकचौरे, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सतीश शिंदे, तहसीलदार कुंदन हिरे व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत या सर्व लोकांची बंदिस्त जागेत सोय कुठे करता येईल यावर विचारविनिमय करण्यात आला. शिर्डीपासून ३ किलोमीटर अंतरावर असलेल्या पालखी निवारा येथे असलेल्या दोन बंदिस्त सभागृहांत त्यांची व्यवस्था करण्यासंदर्भात व्यवस्थापनाला विनंती करण्याचे या बैठकीत ठरले. त्यानुसार तशी विनंती करण्यात आली. पालखी निवारा व्यवस्थापनाने विनंती मान्य केली व चार दिवसांत १०० जणांना दाखल करून घेण्यात आले.

संस्थान गेली अनेक वर्षे पायी चालत येणाऱ्या साई भक्तांचे भोजन व राहण्याची सोय करत आहे. पालखी निवारा व्यवस्थापन आजवर शिर्डी परिसरात अनेक लोकोपयोगी कामे करत आली आहे.

वेंगुर्ल्यातील खासगी डॉक्टरांना सुरक्षा साहित्य देण्याची मागणी

वेंगुर्ला, दि. १ (वार्ताहर) - कोरोनाचा सर्वाधिक धोका हा वैद्यकीय व्यावसायिकांना आहे. अन्य आस्थापनांमध्ये सुरक्षित अंतर राखून व्यवहार करणे शक्य होते. मात्र, डॉक्टरांचा थेट रुग्णाशी संपर्क येतो. त्यांना दुरून तपासता येत नाही. त्यामुळेच खासगी डॉक्टरांनी वैयक्तिक सुरक्षा साहित्याचे किट शासनाने उपलब्ध करुन द्यावे, अशी मागणी वेंगुर्ला मेडिकल असोसिएशनने वेंगुर्ला नगरपरिषदचे मुख्याधिकारी वैभव साबळे, तहसिलदार प्रविण लोकरे यांच्याकडे केली आहे.

तालुक्यात सुमारे ७० खासगी दवाखाने आहेत. यात दातांचे दोन दवाखाने असून सध्या बंद आहेत. तसेच, तालुक्यात बहुतांशी खासगी डॉक्टर सामाजिक बांधिलकी जपत पूर्णवेळ, काही अर्धवेळ आपले दवाखाने सुरू ठेवून नागरिकांना आपली सेवा देत आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर वेंगुर्ला तालुका मेडिकल असोसिएशनची बैठक एक बैठक पार पडली. या बैठकीत कोरोना प्रादुर्भावावर उपाययोजना तसेच बाह्यरुग्ण विभाग सुरू ठेवावा की ठेऊ नये यावर चर्चा झाली.

भिवंडीतील उड्डाणपुलांसह पेट्रोलपंप सामान्य नागरिकांसाठी १४ एप्रिलपर्यंत राहणार बंद

रतनकुमार तेजे

भिवंडी दि. १ - जगभर कोरोना व्हायरसने थैमान घातले असून देशासह राज्यातही कोरोनाबाधीत रुग्णांनाची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. कोरोनावर उपाय योजना म्हणून संपूर्ण देशात १४ एप्रिल पर्यंत लॉकडाऊन करण्यात आले आहे. मात्र तरीही काही हुल्लडबाज तरुण दुचाकी व चारचाकी वाहनांमधून शहरातील रस्त्यांवर हुल्लडबाजी करतांना दिसत आहेत. तीन दिवसांपासून या हुल्लडबाजांवर कारवाई करण्याचे आदेश भिवंडी पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे यांनी दिले होते. त्यांच्या आदेशानंतर हुल्लडबाज तारूणावर कारवाई करत दंडुके व उठाबाशांची शिक्षा देखील अशा तरुणांना पोलिसांनी केली , मात्र तरी देखील काही तरुण आजही संचारबंदी कायद्याचा उल्लंघन करीत असल्याचे चित्र समोर येत असल्याने आता भिवंडी पोलिसांनाही हुल्लडबाजांवर कारवाई करण्यासाठी ठिकठिकाणी नाकाबंदी केली आहे. मात्र ही नाकाबंदी बऱ्याच ठिकाणी शहरातील उड्डाणपुलांच्या खाली असल्याने काही हुल्लडबाज उड्डाणपुलांवरून पोलीसांना चकवा देऊन जात असल्याचे पोलीस प्रशासनाच्या निदर्शनात आल्या नंतर आता भिवंडीतील सर्व उड्डाणपूल १४ एप्रिल पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय भिवंडी पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे यांनी घेतला आहे. त्याचबरोबर अत्यावश्यक सेवा देणारी वाहने वगळता शहरातील सर्व पेट्रोल पंप देखील सामान्य नागरिकांसाठी १४ एप्रिल पर्यंत बंद ठेवण्या आली आहे. तर पत्रकारांनी आपले ओळखपत्र पेट्रोल पंपवर दाखविल्यास पत्रकारांच्या वाहनांना पेट्रोल मिळणार असल्याचे स्पष्टीकरण देखील पोलीस उपायुक्त शिंदे यांनी केले आहे.

भिवंडी पोलीसांच्या य निर्णयामुळे संचार बंदी कायद्याची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होणार असून हुल्लडबाजांचा देखील अटकाव होणार आहे. त्यामुळे पोलोसांच्या या निर्णयाचे शहरातील सुज्ञ नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

HDFC MUTUAL FUND
BHAROSA APNO KA
MUTUAL FUNDS Sahi Hai

HDFC Asset Management Company Limited
A Joint Venture with Standard Life Investments
CIN: L65991MH1999PLC123027

Registered Office: HDFC House, 2nd Floor, H.T. Parekh Marg, 165-166, Backbay Reclamation, Churchgate, Mumbai - 400 020. Phone: 022 66316333 • Toll Free Nos: 1800-3010-6767 / 1800-419-7676 Fax: 022 22821144 • e-mail: cliser@hdfcfund.com • Visit us at: www.hdfcfund.com

NOTICE

NOTICE is hereby given that HDFC Trustee Company Limited, the Trustee to HDFC Mutual Fund ("the Fund") has approved the declaration of dividend in the following Plan launched under the Scheme of the Fund and fixed **Tuesday, April 7, 2020** (or the immediately following Business Day, if that day is not a Business Day) as the Record Date for the same:

Name of the Scheme / Plan / Option	NAV as on March 31, 2020 (₹ per unit)	Amount of Dividend (₹ per unit)	Impact of Dividend Distribution on NAV (₹ per unit)	Face Value (₹ per unit)
Plan launched under HDFC Dual Advantage Fund - Series III:				
HDFC DAF - III - 1304D August 2016 - Regular Option - Normal Dividend Option	11.8027	Distributable surplus, as reduced by applicable statutory levy	Distributable surplus	10.00
HDFC DAF - III - 1304D August 2016 - Direct Option - Normal Dividend Option	12.3450			

Pursuant to payment of dividend, the NAV of the Dividend Option(s) of the above Plan would fall to the extent of payout and statutory levy, if any.

Income distribution will be done / Dividend will be paid to those Unit holders / Beneficial Owners whose names appear in the register of Unit holders maintained by the Mutual Fund / statement of beneficial ownership maintained by the Depositories, as applicable, under the Dividend Option(s) of the aforesaid Plan as on the Record Date.

For **HDFC Asset Management Company Limited**
Sd/-
Authorized Signatory

Place : Mumbai
Date : April 1, 2020

MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.

ICICI PRUDENTIAL MUTUAL FUND
TARAKKI KAREIN!

ICICI Prudential Asset Management Company Limited
Corporate Identity Number: U99999DL1993PLC054135

Registered Office: 12th Floor, Narain Manzil, 23, Barakhamba Road, New Delhi - 110 001.
Corporate Office: One BKC, 13th Floor, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
Tel.: +91 22 2652 5000, Fax: +91 22 2652 8100, Website: www.iciciprumf.com,
Email id: enquiry@icicipruamc.com
Central Service Office: 2nd Floor, Block B-2, Nirlon Knowledge Park, Western Express Highway, Goregaon (E), Mumbai - 400 063. Tel.: 022 2685 2000 Fax: 022 26868313

Notice-cum-Addendum to the Scheme Information Document (SID) and Key Information Memorandum (KIM) of ICICI Prudential Multi-Asset Fund (the Scheme)

Further to Addendum No. 011/02/2020 pertaining to introduction of participation in Exchange Traded Commodity Derivatives (ETCDs) in the Scheme, investors may please note the following:

With effect from closure of business hours on March 28, 2020, the Scheme shall not accept investments from Foreign Portfolio Investors (FPIs).

FPIs shall mean entities who are registered under the Securities and Exchange Board of India (Foreign Portfolio Investors) Regulations, 2019.

Accordingly, the section 'Who can invest' and other relevant sections in the Offer Documents of the Scheme stand modified.

All the other provisions of the SID/KIM/addenda of the Scheme except as specifically mentioned herein above remain unchanged.

This Notice-cum-addendum forms an integral part of the SID/KIM/addenda of the Scheme, as amended from time to time.

For **ICICI Prudential Asset Management Company Limited**
Sd/-
Authorised Signatory

Place : Mumbai
Date : March 24, 2020

The aforesaid notice was earlier published on the AMC's website on March 24, 2020.

No. 001/04/2020

To know more, call 1800 222 999/1800 200 6666 or visit www.iciciprumf.com

As part of the Go Green Initiative, investors are encouraged to register/update their e-mail id and mobile number to support paper-less communications.

To increase awareness about Mutual Funds, we regularly conduct Investor Awareness Programs across the country. To know more about it, please visit https://www.iciciprumf.com or visit AMFI's website https://www.amfiindia.com

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

TATA

TATA STEEL LIMITED
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

कंपनी अधिनियम, 2013 चे कलम 91 आणि कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, 2014 चा नियम 10(1) यास अनुसरून याद्वारे सूचना देण्यांत येते की, प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर जारी केलेल्या आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या व्होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबद्ध नॉन-कन्व्हर्टीबल डिबेंचर्सवरील व्याज खालील प्रमाणे देय आहे :

अनु. क्र.	नॉन-कन्व्हर्टीबल डिबेंचर्स (एनसीडीज)	व्याजाची नियत तारीख	व्याज प्रदानासाठी रेकॉर्ड डेट
1	एकूण ₹ 1,500 कोटीं रकमेची 23 एप्रिल, 2012 रोजी वाटप केलेली 2% एनसीडीज (ISIN: INE081A08181)	23 एप्रिल, 2020	17 एप्रिल, 2020

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
पार्वथीसम कांचीनाधम
कंपनी सेक्रेटरी ॲण्ड
चिफ लिगल ऑफिसर (कॉर्पोरेट ॲण्ड कॉम्प्लायन्स)

31 मार्च, 2020
मुंबई

TATA STEEL

सारस्वत बँक

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
वसुली विभागः 74/सी, समाधान बिल्डिंग, सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई-400 028.
दू. क. 24221202/04/06/11 फॅक्सः 24381310
ईमेल आयडीः incharge_recovery@saraswatbank.com

मागणी सूचना

[कलम 13 (2)]

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) ॲक्ट, 2002 (सरफैसी ॲक्ट, 2002) अन्वये सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8 सह वाचत कलम 13 (12) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन दिनांक 03 मार्च, 2020 रोजी सूचना जारी करुन कर्जदारांना ती प्राप्त झाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांत त्यात वर्णन केलेल्या रकमेची परतफेड करण्यास सांगितले. सदर सूचना रजिस्टर्ड पोस्ट ए. डी. मार्फत कर्जदार/संचालक/जामीनदार/गहाणकार यांना पाठवली होती. तथापि, सर्वांना शेवटच्या ज्ञात पत्त्यावर तिची बजावणी होउ शकलेली नाही. खाली नमूद केलेल्या कर्जदार/संचालक/जामीनदार/गहाणकार यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर सूचनेची बजावणी न झाल्याचे लक्षांत घेउन, सर्व संबंधितांच्या माहितीसाठी ही जाहीर सूचना प्रकाशित करण्यांत येत आहे. खाली वर्णन केलेल्या कर्जदार/संचालक/जामीनदार/गहाणकार यांना ह्या सूचनेद्वारा ह्या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांत सदर मागणी सूचनेतील **29.02.2020** रोजीसच्या **रु. 17,15,99,000.00 (रुपये सतरा कोटी पंधरा लाख नव्याण्णव हजार मात्र)** च्या संपूर्ण थकबाकी रकमेची परतफेड वरील रकमेवरील संविदात्मक दराने पुढील व्याज आणि अनुषंगिक परिव्यय, खर्च, आकार इ. सह एकत्रितरित्या करण्यास सांगण्यात येते. जर, कर्जदारांनी संपूर्ण रकमेची परतफेड करण्यांत कसूर केली तर निम्नस्वाक्षरीकारांना खाली वर्णन केलेल्या तारण मत्तांविरुध्द सरफैसी ॲक्ट, 2002 च्या कलम 13 व 14 अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करणे भाग पडेल :-

1. मे. एक्सेल ओव्हरसीज प्रा. लि. (मुख्य कर्जदार)
संचालकः श्री. शाह रमेश हिम्मतलाल, सौ. शाह कविता रमेश, श्री. वोरा राजेश वसंतलाल
ए. जीडब्ल्यू-6140, भारत डायमंड बोर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (प), मुंबई-400051.
बी. ऑफिस प्रिमायसेस नं. 247/सी, 2रा मजला, पंचरत्न बिल्डिंग, ऑपेरा हाउस, मुंबई-.400004.
सी. ऑफिस प्रिमायसेस नं. 347, 3रा मजला, पंचरत्न बिल्डिंग, ऑपेरा हाउस, मुंबई-.400004.
डी. फॅक्टरी युनिट, प्लॉट क. 176, ए ब्लॉक, सर्व्हे क. 338, सुरत स्पेशल इकॉनॉमिक झोन, गाव-सचिन, ता. चोरयासी, जि. सुरत-394230

2. श्री. शाह रमेश हिम्मतलाल (संचालक/जामीनदार/गहाणकार)
ए. फ्लॅट क. 83, 8वा मजला, कमल बिल्डिंग, 69 वाळकेश्वर रोड, मुंबई-400006.
बी. फ्लॅट क. 93, 9वा मजला, कमल बिल्डिंग, 69 वाळकेश्वर रोड, मुंबई-400006.

3. सौ. शाह कविता रमेश (संचालक/जामीनदार/गहाणकार)
ए. फ्लॅट क. 83, 8वा मजला, कमल बिल्डिंग, 69 वाळकेश्वर रोड, मुंबई-400006.
बी. ऑफिस प्रिमायसेस नं. 247/डी, 2रा मजला, पंचरत्न बिल्डिंग, ऑपेरा हाउस, मुंबई-400004.

4. श्री. वोरा राजेश वसंतलाल (संचालक/जामीनदार) - 204, स्काय हाय टॉवर, ओर्लेम टॅक रोड, मालाड (प), मुंबई-400064.

5. सौ. शाह छाया पंकज (जामीनदार/गहाणकार) - फ्लॅट क. 83, 8 वा मजला, कमल बिल्डिंग, 69 वाळकेश्वर रोड, मुंबई-400006.

तारण मत्तांचे तपशील :-

कच्चा मालाचा साठा, प्रक्रियेतील मालसाठा, अर्ध तयार व तयार माल, स्टोर्स व स्पेअर्स येणे असलेली देयके यांचे जंगमगहाण

मुंबईच्या उप-नोंदणी जिल्हा व न्यु क्वीन्स रोड, मामा परमानंद मार्ग, न्यू चर्नी रोड येथे स्थित आणि "डी" वॉर्ड क. 197 व स्ट्रीट क. 19 आणि 14 अंतर्गत पालिकेच्या कर आणि दराचे निर्धारक आणि संकलक यांनी कर आकारणी केलेल्या व गिरगाव विभागाच्या नवा सर्व्हे क. 8024 भाग, 8023 भाग आणि कॅडेस्ट्रल सर्व्हे क. 1/1487, 3/1487, 5/1487, 6/1487 आणि 7/1487 धारक त्या सर्व अखंड जमिनीवरील ऑफिस प्रिमायसेस नं. 247/सी (मोजमापित एरिया : 314 चौ.फू.), 2रा मजला, पंचरत्न बिल्डिंग, प्लॉट क. 21, पंचरत्न, ऑपेरा हाउस, मुंबई - 400004 चे गहाण (मालक : मे. एक्सेल ओव्हरसीज प्रा. लि.)

मुंबईच्या उप-नोंदणी जिल्हा व न्यु क्वीन्स रोड, मामा परमानंद मार्ग, न्यू चर्नी रोड येथे स्थित आणि "डी" वॉर्ड क. 197 व स्ट्रीट क. 19 आणि 14 अंतर्गत पालिकेच्या कर आणि दराचे निर्धारक आणि संकलक यांनी कर आकारणी केलेल्या व गिरगाव विभागाच्या नवा सर्व्हे क. 8024 भाग, 8023 भाग आणि कॅडेस्ट्रल सर्व्हे क. 1/1487, 3/1487, 5/1487, 6/1487 आणि 7/1487 धारक त्या सर्व अखंड जमिनीवरील ऑफिस प्रिमायसेस नं. 247/डी (मोजमापित एरिया : 286 चौ.फू.), 2रा मजला, पंचरत्न बिल्डिंग, प्लॉट क. 21, पंचरत्न, ऑपेरा हाउस, मुंबई - 400004 चे गहाण (मालक : सौ. शाह कविता रमेश).

मुंबई शहर च्या नोंदणी जिल्ह्यातील मालबार आणि कंबाला हिल विभागाच्या कॅडेस्ट्रल सर्व्हे क. 294 धारक त्या सर्व जमिनीवर बांधलेल्या 69 - वालकेश्वर रोड, मुंबई - 400006 येथील कमल नावाच्या इमारतीच्या 8व्या मजल्यावरील फ्लॅट क. 83 (मोजमापित कार्पेट एरिया : 1341 चौ.फू.) चे गहाण (मालक : श्री. शाह रमेश हिम्मतलाल, सौ. शाह छाया पंकज, सौ. शाह कविता रमेश).

मुंबईच्या उप-नोंदणी जिल्हा व न्यु क्वीन्स रोड, मामा परमानंद मार्ग, न्यू चर्नी रोड येथे स्थित आणि "डी" वॉर्ड क. 197 व स्ट्रीट क. 19 आणि 14 अंतर्गत पालिकेच्या कर आणि दराचे निर्धारक आणि संकलक यांनी कर आकारणी केलेल्या व गिरगाव विभागाच्या नवा सर्व्हे क. 8024 भाग, 8023 भाग आणि कॅडेस्ट्रल सर्व्हे क. 1/1487, 3/1487, 5/1487, 6/1487 आणि 7/1487 धारक त्या सर्व अखंड जमिनीवरील ऑफिस प्रिमायसेस नं. 347 (मोजमापित कार्पेट एरिया : 1037 चौ.फूट), 3रा मजला, पंचरत्न बिल्डिंग, प्लॉट क. 21, पंचरत्न, ऑपेरा हाउस, मुंबई - 400004 चे गहाण (मालक : मे. एक्सेल ओव्हरसीज प्रा. लि.).

त्यावर जोडलेल्या आणि उभारलेल्या व बांधकाम, इमारतीसह जमीन, प्लॉट क. 176-ए ब्लॉक, सर्व्हे क. 338, सुरत स्पेशल इकॉनॉमिक झोन, गाव - सचिन, ता. चोरयासी, जि. सुरत - 394 230 येथील फॅक्टरी युनिट (मोजमापित कार्पेट एरिया : 1000 चौ. मी.) चे गहाण. (मालक : मे. एक्सेल ओव्हरसीज प्रा. लि.).

बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीतील आणि मुंबई शहराच्या जिल्हा व उप-जिल्हा नोंदणी मधील मलबार आणि कंबाला हिल विभागाच्या कॅडेस्ट्रल सर्व्हे क. 294 धारक त्या सर्व जमिनीवर बांधलेल्या 69-वालकेश्वर रोड, मुंबई - 400 006 येथील कमल नावाच्या इमारतीमधील एका कार पार्किंग स्पेस सहीत फ्लॅट क. 93 (मोजमापित कार्पेट एरिया : 2100 चौ. फूट) चे गहाण. (मालक : श्री. शाह रमेश हिम्मतलाल).

टीप : "सर्व तारणे सर्व संघीय सभासद बँकांकडे स-प्रमाण तत्त्वावर भारग्रस्त आहेत.

कायद्याच्या अन्य कोणत्याही प्रयोज्य तरतुदींन्वये आवश्यक आणि तिला योग्य व वाजवी वाटेल अशा अन्य कारवाई किंवा कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्याच्या बँकेच्या अधिकाराला बाधा न आणता ही सूचना दिली आहे.

सही/-
(वाय. जी. दाभोळकर)
प्राधिकृत अधिकारी
सारस्वत को-ऑप. बँक लि.

ठिकाण : मुंबई
दिनांक : 02.04.2020

हे पत्र संचालक इंडियन नॅशनल प्रेस (बॉम्बे) प्रा. लिमिटेड यांच्याकरिता जी. एल्. लखोटिया यांनी जर्नल प्रेस, फ्री प्रेस हाऊस, २१५, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१ येथे छापून प्रसिध्द केले. दिल्ली कार्यालय : १/१८ आय्.एन.एस्. बिल्डिंग, रफी मार्ग, नवी दिल्ली. ११०००१. कोलकाता कार्यालय : ८, मोइरा, स्ट्रीट, कोलकाता- ७०००१७. RNI No. 1691/57
मुंबई दूरध्वनी क्रमांक संपादकीय २२८५३३३५ (विस्तार -१३३) जाहिरात २२८७४५६६, २२८५३३३५, (विस्तार -१२४ व १२५) २२८५३३४२ AIR SURCHARGE 50